# - // प्रेसनोट // -

**सर्वसामान्य व्यक्तींना शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केली असता भरघोस फायदयाचे अमिष दाखवून लाखो रूपयांची फसवणुक करणाऱ्या सायबर गुन्हेगारास शिताफीने जेरबंद**

०२ फेब्रुवारी २०२४ ते ०७ मार्च २०२४ या कालावधीत सेवानिवृत्त महीला यांना अज्ञात व्यक्तींने मोबाईल व्हॉट्सअ‍ॅप जाहीरात व्दारे संपर्क करून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूकीबाबत खोटी माहिती देवून तसेच बनावट वेबपेज व बनावट लिंक पाठवुन सदर बनावट वेबपेजवर शेअर मार्केटनुसार शेअरच्या वाढ व कमी होण्याची माहीती दाखवुन सदर वेबपेज खरे आहे असे भासवुन सदर शेअर ब्रोकर कंपनी ही सेबी ला नोंदनीकृत असल्याचे खोटे प्रमाणपत्र दाखवुन त्यांचे विश्वास संपादन करून शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक केले असता जास्तीत जास्त परतावा देण्याचे अमिष दाखवून त्यांचे एकूण 2,85,50,000/-Rs /- (अक्षरी दोन करोड पंच्याऐंशी लाख पन्नास हजार रूपये) रूपये भरणा करण्यास भाग पाडून संगनमताने कट कारस्थान करून फसवणुक केली. सदर प्रकरणी सायबर पोलीस ठाणे, उत्तर विभाग येथे गु.र.क्र. गुन्हा नोंद क्रमांक ९०/२०२४ कलम 419,420,465 ,467, 468, 471, 120( ब) भा द वि सह 66(c),66( d), आयटी अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात पोहीजे आरोपींनी विविध बॅक खात्यांचा वापर केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर बॅक खात्यात संलग्न असलेले मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषन व प्राप्त गोपणीय माहीतीच्या आधारे सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीतांना दिव-दमन, गुजरात व मुंबई परिसरातून सायबर पोलीस ठाण्याचे अधिकारी व पथकाने शिताफीने ताब्यात घेवून आरोपी नामे **१) शेषनाथ उर्फ गणेश शत्रुघन पांडे वय ४७ वर्ष** २) **सतीश अशोक पूनुमिया वय ४७ वर्ष** ३)**राहुल राजकुमार बच्चन वय ३७ वर्ष** यांस दिनांक ३०/१२/२०२४ रोजी अटक केली आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपीतांकडून सपंर्क करण्यासाठी वापरलेले ०६ मोबाईल फोन व १० सिमकार्ड तसेच एक लॅपटॉप, विविध बॅकचे चेकबुक, एटीएम कार्ड व पासबूक असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे. सदर आरोपी यांनी स्वत:चे तसेच इतर खातेधारकांच्या नावे विविध बनावट बॅक खाती उघडून त्यामध्ये फिर्यादी यांची तसेच इतर बळीतांची मोठया प्रमाणात रक्कम वळती करून घेतली.

**सदर आरोपी यांचेकडून प्राप्त चेकबूक व पासबूक या व्दारे मिळालेली माहीती तसेच आतापर्यंत केलेल्या तपासात अटक आरोपींनी सुमारे ७० बनावट बॅक खाती उघडून त्यामध्ये फसवणुकीची रक्कम वळती करून त्याबदल्यात मोठया प्रमाणात कमिशन घेतल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच सदर खात्याविरोधात १९३० या हेल्पलाईनच्या अहवालानुसार संपुर्ण भारतभर सुमारे १३० च्या वर प्रकरणे नोंद झाल्याचे निष्पन्न झाले आहे.**

सदर अटक आरोपी विरोधात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईदर आयुक्तालयातील मिरा रोड पोलीस ठाणे, कस्तुरबा पोलीस ठाणे, काशीमिरा पोलीस ठाणे, विरार पोलीस ठाणे, वरळी पोलीस ठाणे, इ.ठिकाणी अनेक फसवणुकीच्या गुन्हयाची नोद असल्याचे तपासात निष्पन्न होत आहे. सदर आरोपींना दिनांक १७/१२/२०२४ पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजूर करण्यात आले आहे. त्याबाबत अधिक तपास करीत आहोत.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा.पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री.विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशीकुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दत्ता नलावडे (सायबर गुन्हे), मा.सहायक पोलीस आयुक्त श्री. राजेन्द्र शिरतोडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुवर्णा शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली

पोलीस निरीक्षक सुधाकर हुंबे, पोलीस हवालदार ९९०६२६/सुहास नलावडे, पोलीस हवालदार, ०१०४५४/विदयाधर पावसकर, पो.हवा.क्र. ९८०८६९/सचिन सावंत यांनी पार पाडली.

याद्वारे मुंबई पोलीस सर्वसामान्य जनतेस आवाहन करीत आहेत की,

१. समाजातील सर्वसामान्य लोक, जेष्ठ नागरिक, महिला यांना विनंती आहे की, अशा प्रकारे ऑनलाईन फसवणुक करणाऱ्या भामटयां पासुन सावध रहावे. आर्थिक अमिषास बळी पडू नये.
२. मोबाईल फोनव्दारे संपर्क करणारी अनोळखी व्यक्ती आपला बॅक खाते क्रमांक, पासवर्ड, ओ.टी.पी., डेबीट कार्ड क्रमांक, आधार क्रमांक, पॅनकार्ड क्रमांक अशी संवेदनशील वैयक्तिक माहिती मागत असल्यास त्यास ती न देता, त्वरीत फोन कट करून नजिकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.
३. अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून मोबाईल कोणतेही ॲप डाउनलोड करू नये तसेच लिंक क्लिक करू नये.
४. कृपया बॅंक खाती उघडण्यासाठी तुमची कागदपत्रे इतर व्यक्तींस देवु नयेत, कोणासही तुमचे सिमकार्ड वापरण्याची परवानगी देवु नये. परकी व्यक्ती तुमची वैयक्तिक माहिती बेकायदेशीर कृत्य करण्यास वापरु शकते.
५. इन्टाग्राम / फेसबुक अथवा इतर सोशल मिडीयावर येणा-या गुंतवणुकीच्या जाहीराती अथवा शेअर ट्रेडींग पॉप अप ची योग्य ती खातरजमा न करता त्यावर क्लिक करून अथवा वैयक्तिक माहीती मोबाईल नंबर व इत्यादी माहीती देवु नये अथवा पुढील व्यवहार करू नये.
६. नामांकीत शेअर ट्रेंडींग ब्रोकर चे नाव वापरुन व्हॉट्सअॅप मध्ये अॅड करून व बनावट वेबसाईटचा वापर करुन फसवणुक करीत असल्याचो दिसुन येत आहे. अशा कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गुंतवणुक करून नये.

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930 OR https://cybercrime.gov.in**